# प्रेसनोट

नाशिक,
दि.११/१/२०२२

**आरोपी गणेश बाबुराव घुगे, खाजगी इसम, रा.पवन नगर, सिडको, नाशिक यास ७०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक करून त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कारवाई केलेबाबत...**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | मुंबई नाका पो.स्टे. नाशिक शहर गु.र.नं. १६/२०२२ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अ |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | गणेश बाबुराव घुगे, खाजगी इसम, रा.पवन नगर, सिडको, नाशिक |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ७०,०००/— |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ७०,०००/— |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचे निवडणूक विषयक जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरण जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक येथून मंजूर करून देण्यासाठी खाजगी इसम गणेश बाबुराव घुगे याने तक्रारदार यांचेकडे ७०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आरोपी गणेश बाबुराव घुगे, खाजगी वाहन चालक याने तक्रारदार यांचेकडून ७०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि. १०/१/२०२२ रोजी पंच व साक्षीदारांसमक्ष जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक कार्यालयाचे आवारात स्विकारल्याने त्यास दि. १०/१/२०२२ रोजी ताब्यात घेऊन त्याचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये मुंबई नाका पो.स्टे. नाशिक शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ई— मेल :— spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स अॅप क्र :— ९९३०९९७७००

(सतिश भामरे)
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक